**जिल्हा परिषदेकडील कनिष्ठ सहायक पदावर पदोन्नतीने, अनुकंपा तत्वावरील नियुक्तीसह नामनिर्देशनाने व वाहनचालकामधून कायमस्वरुपी कनिष्ठ सहायक पदावर येण्यास इच्छुकता दिलेल्या वाहनचालकाच्या नियुक्तीचे प्रमाण निश्चित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः सेप्रनि-२०१८/प्र.क्र.१६२/आस्था-७**
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-४००००१.
दिनांक :- ४ जून, २०१८

**शासन निर्णय**

**वाचा :- शासन अधिसूचना सा.प्र.वि. क्र.आरटीआर २०१४/प्र.क्र.३५५/१२, दि. ६ जून,२०१७.**

**प्रस्तावना :-** बृहन्मुंबईबाहेरील शासकीय कार्यालयातील “लिपिक-टंकलेखक”,गट क या पदावरील सेवा प्रवेशाचे विनियमन करण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाने दिनांक ६ जून,२०१७ रोजीच्या अधिसूचनेव्दारे नियम तयार केले आहेत.

जिल्हा परिषदेकडील लिपिक संवर्गातील कनिष्ठ सहायक या पदाचे सेवाप्रवेश नियम महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम,१९६७ अन्वये विहीत केलेले आहेत. शासनाने उपरोक्त दिनांक ६ जून, २०१७ च्या अधिसुचनेनुसार लिपीक-टंकलेखक पदाचे सेवा प्रवेश नियम सुधारित केलेले आहेत. त्यामुळे जिल्हा परिषदेतील कनिष्ठ सहायक या पदाचे सेवाप्रवेश नियम व शासनाकडील लिपीक-टंकलेखक पदाचे सेवा प्रवेश नियम यात एकसूत्रता असण्याच्या दृष्टिने जिल्हा परिषदेमधील कनिष्ठ सहायक पदाचे सेवा प्रवेश नियम सुधारित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. आता सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ६ जून,२०१७ च्या अधिसूचनेतील तरतुदी विचारात घेऊन ग्रामविकास विभाग खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :--**

(१) जिल्हा परिषदेकडील कनिष्ठ सहायक पदावर पदोन्नतीने, अनुकंपा तत्वावरील नियुक्तीसह नामनिर्देशनाने व वाहनचालकामधून कायमस्वरुपी कनिष्ठ सहायक पदावर येण्यास इच्छुकता दिलेल्या वाहनचालकाच्या नियुक्तीचे प्रमाण ४०:५०:१० असे निश्चित करण्यात यावे.

(२) हा निर्णय जिल्हा परिषदेच्या कार्यक्षेत्रातील लिपिक संवर्गातील कनिष्ठ सहायक या पदासाठी लागू होईल.

(३) कनिष्ठ सहायक पदावर पदोन्नतीने, अनुकंपा तत्वावरील नियुक्तीसह नामनिर्देशनाने व वाहनचालकामधून कायमस्वरुपी कनिष्ठ सहायक पदावर येण्यास इच्छुकता दिलेल्या वाहनचालकाच्या नियुक्ती प्रमाण व पदनिश्चिती निश्चित केल्यानंतर नियुक्ती पुढील मार्गाने करण्यात यावी.

(क) गट-ड मधील पदावर किमान तीन वर्षापेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा पूर्ण केलेल्या व ज्यांनी पदवी धारण केली आहे व ज्यांनी मराठी टंकलेखनाचे किमान ३० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे किंवा इंग्रजी टंकलेखनाचे किमान ४० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र धारण केले आहे अशा व्यक्तीमधून ज्येष्ठता अधीन पात्रता या निकषावर योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने;

किंवा

(ख) पुढील उमेदवारांमधून नामनिर्देशनाव्दारे,-

(एक) खुल्या वर्गातील व्यक्तींसाठी एकोणीस वर्षापेक्षा कमी वय नसलेल्या आणि अडतीस वर्षापेक्षा जास्त वय नसलेल्या आणि मागासवर्गीय व्यक्तीसाठी त्रेचाळीस वर्षापेक्षा जास्त वय नसलेल्या;

(दोन) ज्यांनी पदवी धारण केलेली आहे; आणि

(तीन) ज्यांनी मराठी टंकलेखनाचे किमान ३० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे किंवा इंग्रजी टंकलेखनाचे किमान ४० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र धारण केलेले आहे;

किंवा

(ग) अनुकंपा तत्वावर निवड करण्यासाठी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांनुसार ज्यांनी पदवी धारण केली आहे व ज्यांनी मराठी टंकलेखनाचे किमान ३० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे किंवा इंग्रजी टंकलेखनाचे किमान ४० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र धारण करीत असलेल्या उमेदवाराची अनुकंपातत्वावर नियुक्तीने;

किंवा

(घ) गट-क मधील वाहनचालक या पदावर किमान तीन वर्षापेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा पूर्ण केलेल्या व ज्यांनी पदवी धारण केली आहे व ज्यांनी मराठी टंकलेखनाचे किमान ३० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे किंवा इंग्रजी टंकलेखनाचे किमान ४० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र धारण करणा-या व कनिष्ठ

सहायक पदावार येण्यास इच्छुकता दिलेल्या व्यक्तीमधून,ज्येष्ठता अधिन पात्रता या निकषावर योग्य व्याक्तीच्या कायमस्वरुपी संवर्ग बदलीने नियुक्ती देता येईल. वाहनचालक या पदावरुन नियुक्ती दिलेल्या व्यक्तीची कनिष्ठ सहायक पदावरील सेवा ज्येष्ठता कनिष्ठ सहायक पदावरील नियुक्तीच्या दिनांकापासून निश्चित करण्यात येईल;

परंतु माजी सैनिकांमधून अर्ज करण्यास पात्र असलेल्या उमेदवारांनी ज्यांनी पदवी धारण केली आहे व ज्यांनी ज्यांनी मराठी टंकलेखनाचे किमान ३० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे किंवा इंग्रजी टंकलेखनाचे किमान ४० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र पात्रता धारण केली नसेल अशा उमेदवारास, सदर अर्हता त्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासून अकरा महिन्यांच्या कालमर्यादेत प्राप्त करील या अटीवर सदर पदासाठीच्या स्पर्धा परीक्षेकरिता अर्ज करण्यास परवानगी दिली जाईल.

पंरतु असे की, सदर पदावर माजी सैनिकातून नियुक्त झालेल्या व्याक्तीने ज्यांनी मराठी टंकलेखनाचे किमान ३० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे किंवा इंग्रजी टंकलेखनाचे किमान ४० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र त्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासून अकरा महिन्यांच्या कालमर्यादेत धारण न केल्यास, सदर व्यक्तीची सेवा समाप्त करण्यात येईल.

पंरतु आणखी असे की, सदर पदावर अनुकंपा तत्वावर नियुक्त होणारी व्यक्ती ज्यांनी मराठी टंकलेखनाचे किमान ३० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे किंवा इंग्रजी टंकलेखनाचे किमान ४० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र धारण करीत नसेल तर, अशा व्यक्तीने सदर अर्हता शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या कालमर्यादेत सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा याबाबत शासनाच्या प्रचलित आदेशानुसार कारवाई करण्यात येईल.

पंरतु आणखी असे की, सदर शासन निर्णय निर्गमित होणा-या दिनांकापूर्वी अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठीच्या प्रतिक्षा यादीत अंतर्भूत केलेल्या उमेदवारांना माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्र ही शैक्षणिक अर्हता लागू राहील. तथापि, शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अनुकंपा तत्वाव्दारे नियुक्तीसाठी प्रतिक्षा यादीत नांवे नोंदविण्याकरिता पदवी ही शैक्षणिक अर्हता धारण करणे आवश्यक राहील.

परंतु आणखी असे की, खुल्या प्रवर्गातील व्यक्तीसाठी एकोणीस वर्षापेक्षा कमी वय नसलेल्या आणि अडतीस वर्षापेक्षा जास्त वय नसलेल्या आणि मागासवर्गीयासाठी त्रेचाळीस वर्षापेक्षा जास्त वय नसलेल्या ही उच्चतम वयोमर्यादा ही अनुकंपा किंवा पदवीधर अंशकालीन यासारख्या पसंतीक्रमांतर्गत आणि माजी सैनिक,अंपग,प्रकल्पग्रस्त,भूकंपग्रस्त व खेळाडू यासारख्या समांतर आरक्षणंतर्गत वर्गातून नियुक्त करावयाच्या उमेदवारांना लागू राहणार नाही. यासारख्या वर्गातील उमेदवारांना शासनाने वेळोवेळी घोषित केलेली उच्चतम वयोमर्यादेसंदर्भातील प्रचलित धोरण लागू राहील.

परंतु असे की, पदोन्नतीने किंवा वाहनचालकामधून कायमस्वरुपी बदलीने नियुक्तीसाठी विहित अर्हता धारण करणारे उमेदवार उपलब्ध नसल्यास, नियुक्ती प्राधिका-यांना पदोन्नतीचे व वाहनचालकामधून कायमस्वरुपी बदलीचे प्रमाण शिथील करुन उमेदवारांची नामनिर्देशनाने नियुक्ती करता येईल.

(४) कनिष्ठ सहायक पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार,विभागीय परीक्षा, आवश्यक असल्यास, उत्तीर्ण केली नसेल किंवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल तर, सदर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

(५) कनिष्ठ सहायक पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, हिंदी व मराठी भाषा परीक्षा, अगोदरच उत्तीर्ण केलेल्या नसतील किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल, तर तिला सदर परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

(६) कनिष्ठ सहायक पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक संचलन प्रमाणपत्र धारण करणे आवशाक राहील.

वरील सर्व तरतुदी हया शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून लागू राहतील. कनिष्ठ सहायक पदाच्या सेवाप्रवेश नियमात यथावकाश सुधारणा करण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५३०१२३५०५९५२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Girish Dinkar Bhalerao

Digitally signed by Girish Dinkar Bhalerao
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ca8fd093b771c4573a3a57cff525280d3134f0f7af228e47d44bd71716c64fc3, cn=Girish Dinkar Bhalerao
Date: 2018.06.04 12:17:43 +05'30'

**( गिरीश भालेराव)**
उप सचिव महाराष्ट्र शासन

प्रति,

१) विभागीय आयुक्त (सर्व)

२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा (सर्व)

३) उपायुक्त (आस्थापना), सर्व विभागीय आयुक्त कार्यालये.

४) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) सर्व जिल्हा परिषदा

५) निवडनस्ती-आस्था-७